# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**सायंकाळ**

**(पोलीस वार्तापत्र)**

**दिनांक ०३.१०.२०२५ शुक्रवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०३.१०.२०२५ रोजी मा. जिल्हा न्यायाधिश—१४ तथा अति. सत्र न्यायाधिश नागपुर श्री. एन.एच जाधव यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३४४/२०१८ मधील, पोलीस ठाणे धंतोली येथील अप. क्र. १२५/२०१८ कलम ३९२, ३९५, ३२३, ३४ भा.द.वि. या गुन्ह्यातील आरोपी नामे राहुल राजू कळमळकर, वय ३० वर्षे, रा. खरबी, वाठोडा, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३९२ भा.दं.वि. अन्वये ०४ वर्षे कारावासाची शिक्षा व ५०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा, ठोठावली. तसेच, आरोपी नामे दिपक राजकुमार परतेकी व क्रिष्णा महादेवराव बिंजाडे यांना सि.आर.पी.सी कलम २३५(१) अन्वये नमुद गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करण्यात आले आणि फरार आरोपी नामे कुणाल लक्ष्मण उराडे व निरंजन यांना सि.आर.पी.सी. कलम २२७ अन्वये नमुद गुन्हयातून डिस्चार्ज करण्यात आले.**

दिनांक ०९.०५.२०१८ चे २०.२० वा. चे सुमारास, फिर्यादी जयंत मधूकर खोडे, वय ४५ वर्ष, रा. प्लॉट नं. ५, शास्त्री नगर, खरबी चौक, नागपूर यांनी शोरूममधुन मिळालेली कॅश १०,०८,८२६/—रू. सोबत घेवुन, दुकानात काम करणारा ईसम नामे दुर्गेश याचेसह शोरूमचे दुचाकीने पोलीस ठाणे धंतोली हद्दीत रामकृष्ण गार्डन कडे जाणाऱ्या रोडवर दुचाकीने आले असता, तेथे शोरूमध्ये यापूर्वी काम करणारा ईसम आरोपी नामे राजू कळमळकर व त्याचे ईतर ०४ साथिदार हे आले. आरोपींनी संगणमत करून, फिर्यादीस थांबवून, फिर्यादी व त्याचे सोबती दुर्गेश यास हातबुक्कीने मारहाण करून व चाकूचा धाक दाखवून फिर्यादी जवळील गाडीसह कॅश घेवुन पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक १८.०५.२०१८ रोजी २३.२० वा. अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. श्री. ए. के. वडतकर यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. ए. बी. झिकार यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री चेतन ठाकुर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. सुष्मा बेले व पोहवा. अचल हरगुळे यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**सक्करदरा पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १८.०७.२०२५ चे २३.०० वा. ते दि. २९.०७.२०२५ चे ०७.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी शेख गुलाम ख्वाजा, वय ४६ वर्षे, रा. मोठा ताजबाग दर्गाह रोड, एकता चौक, करीम बाबाचे घराजवळ, सक्करदरा, नागपूर यांनी त्यांची ॲक्टीव्हा मोपेड क्र. एम.एच. ४९ बि.डी. १४९७ किंमती अंदाजे ४०,०००/—रू. ची ही घरासमोर लॉक करून, पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या

तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीस ठाणे सक्करदरा येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे नौशाद खान उर्फ शक्तीमान वल्द अलम खान, वय ४३ वर्षे, रा. मोठा ताजबाग, बुलंद गेट जवळ, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन अॅक्टीव्हा मोपेड क्र. एम.एच. ४९ बि.डी. १४९७ किंमती ४०,०००/—रू. ची जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. प्रदीप सिरसकर, सहा. पोलीस आयुक्त (सक्करदरा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि. प्रमोद पोरे, पोउपनि. महेश पांडे, पोहवा. मनोज काळसर्पे, टप्पूलाल चुटे, प्रविण ढुमणे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे अंबाझरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०२.१०.२०२५ चे ०३.१० वा. चे सुमारास, अंबाझरी पोलीसांचे तपास पथक हे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, अमरावती रोड, गणेश टॉवर जवळ अंगात कत्थ्या रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला ईसम हा शस्त्रासह फिरत आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव जेम्स पॅट्रीक सिंग, वय २७ वर्षे, रा. तेलंगखेडी, गोंड टोली, बागडीच्या घराजवळ, अंबाझरी, नागपूर असे सांगीतले. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कमरेत एक लोखंडी सत्तूर किंमती अंदाजे १५०/— रू. चा मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी सत्तूर बाळगुन मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोउपनि. सतिश मेश्राम यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. भिवापूरे ८०५५५१०२८८ यांनी आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे कळमणा</u> :—** दिनांक ०२.१०.२०२५ चे १६.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, शिरपूर रोड, विटा भट्टी, चेअर्स कंपनी जवळ, पावनगाव, नागपूर येथे राहणारे फिर्यादी रमेश झंगी यादव, वय ३१ वर्षे यांची ०२ वर्षीय मुलगी कु. हंसीका ही घरा समोरील अंगणात खेळत असता, घराजवळील पाण्याने भरलेल्या विटा भट्टीच्या खड्डयात पडल्याने ती पाण्यात बुडाली. तिला पाण्याबाहेर काढून उपचाराकरीता भवानी हॉस्पीटल, पारडी येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. रोशन राऊत ७६२०७३७४५२ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतली आहे.

**<u>२) पोलीस ठाणे बजाजनगर</u> :—** दिनांक २६.०९.२०२५ चे २१.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बजाजनगर हद्दीत लोकमत चौक फुटपाथवर एक अनोळखी ईसम वय अंदाजे ५० वर्षे वयाचे हे बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, आय.सि.यू. येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दि. ०३.१०. २०२५ चे १०.३० वा. चे सुमारास, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोहवा. नखाते यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे पारडी</u> :—** सौ. मिनाक्षी प्रदीप जिभकाटे, वय ३२ वर्षे, रा. घरसंसार सोसायटी, पारडी, नागपूर ह्या दिनांक २९.०९.२०२५ रोजी ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे पारडी हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता सोबत मुलगा नामे श्रीहान वय ०२ वर्ष ०८ महिने व प्रिहान वय ०९ महिने यांचेसह निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>**— रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— साधारण, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— पोपटी रंगाची साडी व ब्लाउज घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** कु. दिव्यानी तोताराम पटले, वय २२ वर्षे, रा. गल्ली नं. ३०, विनोबा भावे नगर, यशोधरानगर, नागपूर ही दिनांक २९.०९.२०२५ रोजी १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ४ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— आकाशी रंगाचा टि—शर्ट व सिमेंट रंगाची लॅगीन घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.

**<u>३) पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** मुजीब उर रहेमान मोहम्मद रफीक, वय ३१ वर्षे, रा. संघर्ष नगर, मस्जिद जवळ, यशोधरानगर, नागपूर हे दिनांक २६.०९.२०२५ रोजी १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट, केस— काळे, अंगात— निळया रंगाचा शर्ट व काळया रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**<u>४) पोलीस ठाणे यशोधरानगर</u> :—** गजानन रामाजी लोनारे, वय ७० वर्षे, रा. प्लॉट नं. ७२, इंद्रानगर, भिलगाव, यशोधरानगर, नागपूर हे दिनांक ३०.०९.२०२५ रोजी १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतुन राहते कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ६ इंच, केस— पांढरे, अंगात— सिमेंट रंगाचा फुल शर्ट व निळया रंगाचा बरमुडा घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


मिनाक्षी प्रिहान


रियांश


दिव्यानी


मुजीब


गजानन

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**